# विषय:- राजकीय बदलते स्वरूप, युवा संस्कृती आणि राजकारण

प्रा. हेमंत संतोषराव तिमांडे
(राज्यशास्त्र विभाग)
मारिया कला व विज्ञान
महाविद्यालय, देवळी,जि. वर्धा.
मो.न. ९५७९४०१४३८
ईमेल:-hemanttimande1981@gmail.com

समग्र विश्वामध्ये भारताला लोकशाही कृषीप्रधान देश म्हणून ओळखल्या जाते.आज राजकारणाचे स्वरूप हे बदलताना दृष्टीक्षेपास येत आहे. राजकीय क्षेत्र हे गुंतागुंतीचे तद्वतच लोकशाही पुढील आव्हान निर्माण करणारे आहेत. राजकीय दृष्ट्या विचार करायचा झाल्यास देशातील सर्वच राजकीय पक्षामध्ये गत अनेक दशकापासून युवकाच्या विविध संघटना ह्या कार्यरत आहेत. ह्या संघटनांमधून नवे नवे नेतृत्व उदयास येत आहेत.

अद्ययावत तंत्रज्ञान हे विकसीत झाल्यामुळे आमूलाग्र बदलाने जगात मोठ्या प्रमाणावर परिवर्तन घडून आले आहेत. जेव्हा देश ही संकल्पना उच्चारतो तेव्हा तिचा अर्थ काय हे आधी समजून घेणे गरजेचे आहे. देशाच्या सरकारचे प्राथमिक कर्तव्य आहे की, सत्तारूढ सरकारने सामान्य जनतेचे हित जोपासले पाहिजे, विकासाचे धोरण ओळखणे, नव्या रोजगाराच्या संधी उपलब्ध करणे, तद्वतच आर्थिक सुरक्षितता प्रदान करणे हे शासनाचे कर्तव्य आहे. सत्तेत सरकार हे कुठल्याही पक्षाचे असो जनहित साध्य करणे हे त्यांचे प्रमुख उद्दिष्ठ असावयास हवे.

युवा संस्कृती आणि राजकारण यांचा जवळपास संबंध आहे. युवा संस्कृती ही तरूणांच्या मुल्यांना आकार देणारी ठरते. ज्यामुळे ते सामाजिक आणि राजकीय बदलांचे माध्यम बनते तर राजकारण हे तरूणांना निर्णय प्रक्रियेत सहभागी होण्यासाठी व्यासठीठ देणे, जेणेकरूने ते त्यांच्या पिढीला विविध समस्यांवर(रोजगार, शिक्षण पर्यावरण) आदी घटकांवर ते आपल आवाज हा बुलंद करू शकेल आणि देशाच्या लोकशाहीला ते अधिक बळकट करण्यास हातभार लावेल.

आज घडीला तरूणांचा सहभाग हा केवळ मतदान करणे. यापुरताच मर्यादीत न ठेवता तर ते सक्रिय कार्यकर्ते म्हणून निर्माण व्हावे हाच त्यामागचा उद्दात्त हेतू आहे.

युवा संस्कृतीमधूनच अनेकदा सामाजिक न्याय पर्यावरण आणि मानवी हक्कासाठी चळवळी जन्म घेतात सामाजीक आणि राजकीय सक्रियेतूनच युवा नेतृत्वाला चालना निर्माण होते. साहीत्य कला क्रिडा संगीताच्या माध्यमातून नवतरूणाईला स्वत:ची ओळख निर्माण करता येईल.नवे नवे नेतृत्व हे उदयास येईल.

## २) संशोधनाची गरज:-

आम्ही आज उद्ययावत माहिती आणि तंत्रज्ञानच्या जगतात राहताना अज सामाजिक आणि राजकिय दृष्ट्या झालेले बघता संशोधनाची गरज भासत आहे ही काळाची निकड आहे.

जुन्या रूढी आणि मूल्यांना बघता अनेक आव्हाने ही लोकशाहीपुढे उभी ठाकली आहेत. ती युवा संस्कृतीसमोर आव्हान ठरत आहे. ज्यामुळे सामाजिक विचारसरणीमध्ये झालेले बदल निश्चितच राजकीय क्षेत्रात आमूलाग्र परिणाम करणारे आहेत. निश्चितच कालांतराने याचा राजकीय धोरणावर सुध्दा बदल दिसून येतोय यात काही तिळमात्र संदेह नाही. आज मोठ्या प्रमाणात युवा वर्ग हा उच्च शिक्षित आहेत. देशहितांच्या बाबत तरूणांमध्ये नवे नवे विचार प्रवाह घडून येत आहे हे नाकारता येत नाही.

राजकारणातील तरूणांची भूमिका ही मोलाची ठरत आहे. भारतीय लोकशाही मध्ये राजकारणाचे बदलते प्रवाह बघता मोठ्या प्रमाणावर तरूण वर्ग हा राजकारणामध्ये सक्रियपणे सहभागी होतांना दिसून येतो आहे. सार्वत्रिक निवडणूकामध्ये तद्वतच स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणुकामध्ये तरूणांचे प्रमाणे हे दिवसेंदिवस वाढतच आहे ग्रामीण  असो वा शहरी भागात सुध्दा युवकांचे राजकारणातील टक्केवारी ही वाढतच आहे. याचा निश्चितच देशाची धोरणे ठरवितांना अनुकूल असा फायदा होईल.

तरूण वर्ग हा मोठ्या प्रमाणात, सोशल मिडीयाद्वारे सक्रीय झालेला आहे. विविध मुद्यांवर त्याने लक्ष केन्द्रीतर करून जनहितासाठी बुलंद आवाज उठविला आहे.

## *राजकारण आणि निवडणुकांची महत्वाची भूमिका:-

लोकशाही शासन व्यवस्थेत निवडणूका अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावत आहेत. दर पाच वर्षांनी निवडणूकाच्या माध्यमातून देशातील नागरिकांना आपल्या न्याय हक्कासाठी प्रतिनिधीची दिवड ही संविधानिक मार्गाने करता येते. भारतीयर राज्यघटनेने दिलेले मौलिक अधिकारांचा माध्यमातून तसेच

संविधानाच्या अधिकारांद्वारे निवडणुकांद्वारे लोक आपली राजकिय ईच्छा व्यक्त करून शासनामध्ये आपला सहभाग सुनिश्चित करतात. योग्य पारदर्शक व मुक्त निवडणुकांशिवाय लोकशाहीची खरी मूल्ये ही अधोरेखित होऊच शकत नाही हे सत्यच मानावे लागेले यात काही दूमत नाही.

***प्रसिध्द राजकीय विचारवंत हॅरॉल्ड लास्की:-**

यांच्या मते निवडणूक ही अशी एक प्रक्रीया आहे की, जिच्याद्वारे एखाद्या समुदायातील सदस्य त्यांच्या प्रतिनिधिंची निवड करतात.

निवडणूक ही लोकशाहीतील मूलभुत प्रक्रीया आहे. जिच्या माध्यमातून समाजातील नागरिक सार्वजनिक कारभार करणाऱ्या नेत्यांची निवड करतात. या प्रक्रियेमुळे लोकशाहीतील संसदेची स्थापना करणे व ती टिकवून ठेवणे शक्य होते.

**३) संशोधनाचे महत्व:-**

ज्ञानाच्या प्रस्फोटाने मानवाने काल मिळविलेली एकाद्या विषयाची माहिती आज घडीला अपुरी ठरते आहे. आज आर्थिक, राजकीय, सामाजिक, धर्मिक, शैक्षणिक या जीवनाच्या प्रमुख क्षेत्रात प्रचंड प्रमाणात परिवर्तन घडून येत आहे. समाजात असे परिवर्तन होते. त्याचप्रमाणे समाजाच्या शिक्षणाकडून असणाऱ्या अपेक्षाही बदलत असतात. लोकशाहीचा स्विकार, धर्मनिरपेक्षता, शहरी भागात वेगाने झालेले आधुनुकिकरण, शिक्षणाच्या राष्ट्रीय उद्दिष्टांच्या प्राप्तीसाठी सन १९८६ मध्ये ही शैक्षणिक संशोधनावर विशेष भर देण्यात आला आहे.

संशोधनाचा उपयोग हा संशोधकाला स्वत:ला भेडसावणाऱ्या समस्या ह्या जेव्हा शाळीय पध्दतीने व संशोधनाची तत्वे व पध्दतींचा अवलंब करून एखाद्या संशोधकाने सोडविले तेव्हा त्याला मिळणारा आनंद हा अवर्णनीय असेल, त्या संशोधनासाठी त्याने जे वाचन केले असेल त्यातून मिळालेले ज्ञान त्याच्या बौद्धिक कक्षा विकसीत करेल. त्याला आलेले विविध प्रकारचे अनुभव, त्या समस्येची परीपूर्ण जाणीव करून देण्यास उपयुक्त ठरतील.

संशोधनाचे महत्व लक्षात घेणे गरजेचे आहे. भावी काळातही संशोधनाची दिशा अधिक सुलभ होण्यासाठी संशोधकाला उद्यावत माहिती ही मोलाची ठरणारी आहे, याच काही चूक नाही,

*** युवापिढी, संसकृती आणि राजकारणः-**

राजकारण म्हणजे समाजकारण नव्हे आणि समाजकारण म्हणजे संस्कृतीकरण नव्हे हे सत्य आता सर्वसामान्य जनतेला नवतरूणांना वारंवार व अधिकाधिक सांगत राहणे मोलाचे आहे.

राजकारणांमध्ये तरूणांचा टक्का हा सतत वाढला पाहिजे ही काळाची गरज आहे. युवकांचा बदलता दृष्टीकोन हा राजकीय तद्वतच युवा सशक्तीकरणासाठी मोलाचा पाहिजे. त्याशिवाय तरणोपाय नाही. तरूणांची भूमिका ही मोलाची आहे. भारताचे भविष्य घडविण्यासाठी तरूणाची भूमिका पाहता राजकीय जागृकता आणि त्यांचा सहभाग बघता पूर्वी भारतातील तरूण लोक राजकारणाबाबत उदासीन होते. परंतु आता चित्र बदलले आहे. गत काही वर्षापासून तरूणाई ही जागृत झाली आहे. तरूणानों आपले हक्क व अधिकार कळले आहे. ते जागृत झाल्यामुळे देश विधायक कार्यासाठी तरूणांची सकारात्मक भूमिका ही मौलीक ठरत आहे. देशाचा भावी आधारस्तंभ तरूणाई ही खऱ्या अर्थाने स्वयंपूर्ण बलशाली राष्ट्राचे स्वप्न निश्चितच साकार करेल यात काही शंका नाही.

***समारोपः-**

आज बदलते राजकीय समीकरणे आणि लोकशाही पुढे नवी आव्हान बघता ज्यांकडे देशाचे भावी आधारस्तंभ म्हणून बघितल्या जाते देशाच्या भावी नेतृत्वाची धुरा सक्षमपणे जबाबदारी पार पाडण्यासाठी युवकांचे योगदान हे मोलाचे राहणार आहे. युवा नेतृत्व हे राष्ट्राचे भावी भाग्य विधाते आहेत. देशाला खऱ्या अर्थाने अग्रेसर करण्यासाठी आता तरूणांची भूमिका ही निर्णायक असावयास हवी. देश हा बलशाली विकसीत निर्माण करण्यासाठी युवापिढीचे कार्य हे खंबीरपणे हवे. देश हा भावी काळात जगात महासत्ता म्हणून उदयास येण्यासाठी देशाच्या भावी आधार स्तंभाची भूमिका ही भौलीक ठरणारी आहे. यात काही वावगे नाही.

***सदर्भ ग्रंथसूचीः-**


१) शैक्षणिक संशोधन पध्दती : वि.रा.भिंताडे,:नुतन प्रकाशन पूणे-३०.

२) माध्यमे आणि निवडणूक प्रक्रीया:डॉ. अमर बोंदरे, प्रा.लोमेश बावणकुळे,:
विश्व पब्लिशर्स ॲन्ड डिस्ट्रीब्युटर्स, नागपूर.

३) देशोन्नती वर्तमान पत्र, नागपूर.